# समर्थ रामदास स्वामींची संगीतास लाभलेली देण

**विद्या उत्तमराव धोटे (बोंडे)**
(एम.ए., बी.एड., एम.फिल., संगीत विशारद)
गिरी नगर, यवतमाळ

**प्रस्तावना :**

संगीत कलेला ललीत कलांमध्ये सर्वश्रेष्ठ स्थान आहे. गीत वाद्य आणि नृत्य ह्या तिनही कलांच्या समूहाला संगीत म्हटले जाते. प्राचिन काळापासून ऋषीमुनींनी संगीताची महती वर्णीलेली आहे. सृष्टीचे अंतीम तत्व नाद आहे. संताच्या साहित्यातही संगीत केलेला महत्वाचे स्थान आहे.

मानवाच्या जन्मापासून ते मृत्युपर्यंत संगीत हे त्याच्या सोबत असतेच सर्व संतांनी आपल्या साहित्यात संगीत कलेचा उपयोग करून संत साहित्यात भर पडली. संत तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर माऊली, एकनाथ महाराज, नामदेव, रामदास इतकेच नव्हेत तर राष्ट्रसंत तुकडोजी महाराज इत्यादी अनेक संतांनी समाज प्रबोधनासाठी, समाज कल्याणासाठी राष्ट्रीय ऐक्यासाठी संगीताचा उपयोग केला.

**संत आणि संगीत :**

संगीताचा व अध्यात्माचा अगदी जवळचा संबंध आहे. संताच्या परंपरेत समर्थ रामदासांचे साहित्य अफाट आहे. संत म्हणून रामसांच वेगळेपण इतर संतांपेक्षा सर्वस्पर्शी आहे. समर्थ रामदासीनी परमार्थ आणि प्रपंच एकाठिकाणी बांधून ठेवला. सुंदर जीवन जगण्यसाठी विविध श्लोकांच्या माध्यमातून लोकांना जागृत केले. प्रयत्नांना देव मानूण, भोंदूगिरी आणि आळशीपणाची चीड आली पाहिजे असे विचार समर्थ समाजास सांगतात, समर्थ रामदासस्वामींना अध्यात्म, समाजकारण, राजकारण, शिक्षण, कला शिस्त, योगशास्त्र, वनस्पतीशास्त्र व संगीत शास्त्राची देखील त्यांना जाण होती. समर्थांच्या ओव्या असो भजन असोत, भारूड असो त्यात संगीत ओतप्रोत भरलेले आहे. समाजात आलेली मरगळ, निराशा, निरुत्साह दूर करण्यासाठी आपल्या शब्दरचनेस संगीताच्या सुरांची जोड देऊन समाजात जागृती उत्पन्न करण्याचा प्रयत्न सर्वच संत मंडळींनी केला. समर्थ रामदासांनी गायन केलेची महती वर्णन करतांना धन्य ती गायनी कला असा उल्लेख करतात. समर्थ रामाजवळ गोड गाण्यासाठी प्रार्थना करतात. संत ज्ञानेश्वर तुकाराम नामदेव, गोरा कुंभार असे अगनित संताचे योगदान संगीतास लाभलेले आहे. ह्या संपूर्ण संत मंडळींतील एक संत म्हणजे समर्थ रामदास होय.

**समर्थ रामदास स्वामीं च्या भक्तीतून अभिव्यक्त होणारे संगीत :**

समर्थ रामदास बहुआयामी व्यक्तीमत्व होते . या व्यक्तीमत्वात इंद्रधनुष्याचे विविध रंग दडलेले आहेत. त्यांची मोहकता, दिव्यता आणि तेजोमयता समाजावर त्याकाळी मोहिनी घालताना दिसते. समाजातील भिती, दु:ख, द्रारिद्र य उदासीनता, वैफल्य, निष्क्रीयता, समर्थ रामदासस्वामींना अस्वस्थ करत होते. त्यासाठी ते विविध योजना व कृती यांची सांगड घालताना दिसतात. समाज बदलावयाचा असेल तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावयाचा असेल तर, समाजाच्या डोक्यावर असलेलं अज्ञात दूर करणे आवश्यक आहे, असे त्यांना सतत वाटत असे. 'आधी केले, मग सांगितले' असा आदर्श लोकांसमोर त्यांनी ठेवला. सर्वांना रुचेल, पचेल, आकलन होईल असा भक्तीचा मार्ग सांगितला. भक्ती ही वृत्ती झाली की, मानवी जीवनात परिवर्तन होते. त्या काळात समाजाला नवा विचार, नवी दिशा दाखविण्याची नितांत गरज होती. त्यासाठी त्यांनी रामाची भक्ती केली व त्यासाठी त्यांनी भक्तीच्या 9 पायऱ्या सांगितल्या व ही भक्ती करण्यासाठी त्यांनी साधन म्हणून संगीताचा आधार घेताला.

**समर्थ रामदासांच्या साहित्यातून प्रकट होणरे संगीत :**

समर्थ रामदांसांच्या साहित्य अफाट आहे. दासबोध, मनाचे श्लोक, 21 समासी दासबोध, करुणाष्टके, आरत्या, भारुडे, समर्थ रामदासांना विविध विषयाची इतकी सखोल माहिती होती. राजकारण, समाजकारण, व्यवस्थापन, अध्यात्म, धर्म साहित्य, मानसशास्त्र, हस्ताक्षर, वैद्यकशास्त्र, संगीतशास्त्र, गायन, वादन, नृत्य, आरोग्यशास्त्र अशा एक न अनेक विषयांचे ज्ञान समर्थांना होते.

समर्थांनी विविध आरत्यांना त्यांच्या खड्या आवाजत चाली दिल्या. समर्थ रामदास स्वामींच्या दासबोध या ग्रंथात संगीतासंबंधी अनेक उल्लेख सापडतात. संगीतातील बरेच शब्द त्यांच्या ओव्यांमध्ये आढळतात . दासबोध या ग्रंथात संगीताबद्दल समर्थांनी गायकांना विविध गोष्टी सांगून सतर्क केले आहे. संगीताचा समर्थांशी संबंध जोडला असता , त्यांनी संगीताला धन्य ती गायनी कला अशी संगीत कलेची धन्यता केली.

संगीत गायनी विद्या। सर्व सद्या मनोरथा।
विदेश पाहता नाही। धन्य ते गायनी कला।
आवडी सकळे लौका। प्रितीने भजती जनी।
इच्छिले पूर्विती सर्वे। धन्य ती गायनी कला।

समर्थांनी संगीत कला ही सर्व श्रेष्ठ कला आहे व ती भक्ताचे मनोरथ पुरविणारी कला आहे. संगीत ही देवाची आवडती कला आहे व भक्ताला ईश्वर प्राप्ती साठी संगीत कला अवगत करावी लागते.

भक्त प्रेमळ भाविक। सभ्य सखेल सात्विक ।19-8॥

गायक हा सज्जन व सभ्य असावा असे समर्थांना वाटते संगीत कलेबद्दलचे ज्ञान त्याला गायकाला सखोल असले पाहिजे असे समर्थांना वाटते.

गायकाला विविध रागांचे ज्ञान असावयाला हवे, तसेच रागातील कोमल स्वर, वर्ज स्वर, तिव्र स्वर या सर्वांची माहिती गायकाला असायला हवी. त्याच प्रमाणे त्याला तीनही सप्तकात गाता यावे असे समर्थांना अपेक्षित आहे व त्या गायकाने तसा रियाज करावा. त्याचप्रमाणे समर्थ रागाच्या वेळेकडे संकेत करताना दिसतात. गायकाचे त्या रागाच्या वेळेप्रमाणे गायन करावे असा कटाक्ष समर्थ करतात. कसे गावे याबद्दल समर्थ म्हणतात -

दुसऱ्याचे अंतर जाणावे। आदर देखोन म्हणावे।
जे आठवेल ते गावे। हे मुर्खपण॥ 18-3-16॥

समर्थांनी अतिशय महत्वाची गोष्ट या ठिकाणी गायकाला सांगीतली आहे. आपले गाणे श्रोत्यांना आवडेल की नाही हे आपल्या गाण्याने श्रोते खुश आहेत किंवा नाही त्यांना आपले गाणे ऐकण्याची उत्सुकता आहे किंवा नाही याचा अभ्यास गायकाने करावा त्याच प्रमाणे गायकाने घस-घस करून घसा खाकरुन मध्येच थांबवून गाणे गाऊ नये त्यासाठी त्याने रोज जो राग म्हणावयाचा आहे त्याचा अभ्यास करावा रियाज करावा.

ताळ तुंबरे तान माने। ताल बद्धतेत गाणे।
तुर्त तार्किक तने मने। तल्लीन होती॥ 14-4-16॥

गाण्याच्या साथीला तंबोरे असावेत तानपुऱ्याच्या झंकारणाऱ्या नादवलयातून गायकाचा सुरेल आवाज मिसळतो. त्यावेळी एक अनोखा आनंद प्राप्त होतो. गाणे तालाला धरून, लयीला धरून चालणारे असावे असे गाणे गायल्याने गायकाचे गाणे अभ्यासपूर्ण असल्याचे श्रोत्यांना जाणवते, असे समर्थ म्हणतात. त्याचप्रमाणे समर्थ म्हणतात की, जाणत्यापासी आपले गाणे गावे, त्याला गाण्यातील मर्म कळायला हवे व जाणत्यापाशी गाणे शिखावे. त्याचप्रमाणे गुरु व शिष्य कसा असावा हे देखील दासबोध ग्रंथात सांगतात. समर्थांनी अनेक रागांची निर्मिती केली व अनेक रागात आपली भजने, अभंग गायली. वरील संपूर्ण उदाहरणांवरून असे लक्षात येते की शास्त्रीय संगीताविषयी समर्थ रामदास हे अधिकारी पुरूष होते.

**निष्कर्ष :**

या विषयाच्या अनुषंगाने समर्थ रामदासांचा साहित्याचा अभ्यास केला असता संगीत क्षेत्रातील समर्थांच्या योगदानाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करता येईल. समर्थ रामदासांचे साहित्य हा मराठी भाषांचा वैचारिक तत्वज्ञानाचा अभंग ठेवा आहे. साहित्य तत्व, भाषा, भावोत्कटता, भक्ती, ज्ञान, वेदांतविचार, जनलोकांचे अनुभव विश्व, तसेच सामाजिक जागृती, उद्बोधन व प्रबोधन या गुणवैशिष्ट्यांमुळे संत वाणीतील शिरोमणी समर्थरामदासांचे स्थान अद्वितीय आहे.

मध्ययुगीन महाराष्ट्रात संगीताला अध्यात्माची जोड मिळण्याचे मुख्य कारण म्हणजे भक्ती आंदोलन होय. संतांची विचारधारा ही आध्यात्म व समाज प्रबोधन या क्षेत्रात उपयुक्त असली तरी, समर्थांच्या वैचारिक बैठकीची चौकट तत्कालीन अन्य भक्ती मार्गातील संतांपेक्षा विस्तृत असल्याचे जाणवते. समर्थांचे लेखन संपूर्ण समाजाच्या कल्याण्यासाठी पूरक असून वर्तमान काळ व भविष्यकाळातही त्याची उपयोगिता प्रासंगिक आहे. समर्थ रामदासांना गायन, वादन व नृत्य या तीनही कलांचे ज्ञान होते हे त्यांच्या विविध रचनांवरून व त्यांनी निर्माण केलेल्या रागांवरून सिद्ध होते.

**संदर्भ ग्रंथ**

1. दासबोध - प्रा. के.वि. बेळसरे.
2. कल्याणी मासिक - श्री समर्थ रामदास स्वामी विशेषांक 2008
3. समर्थ रामदासांचे संगीत चिंतन - सुरमणी डॉ. कमलाकर परळीकर
4. युगबोध मासिक - 2002-03